## बापूंची ९ वचने

१) अनिरुद्ध क्षेत्री जो आला शरण । तयासी कैसा भय दु:ख भार ।

२) श्रद्धावान हाचि माझा मित्र सखा । तयासी मी रक्षीण देवयान पंथी ।

३) ग्रंथराज हेचि जयाचे अनुसंधान । तयाचा योगक्षेम मीची वाहे ।

४) जाण मी न कधी टाकीन तुजसि । देईन नित्य मन:सामर्थ्य बल बुद्धी ।

५) मर्यादा हाचि जयाचा तारक मार्ग । तयाचा मी आश्रय सर्वकाळ ।

६) जो जो मज स्मरे दृढभावे । तयासी आनंदघन देईन मी ।

७) मज सवे जो प्रेमे येईल । तयाचे अशयक्य, शक्य मी करीन ।

८) तू वानर मी मित्र तुझा खचित । रावण मरणार जाण तू निश्चित ।

९) जेथ सेवा भक्ती शारण्य राहे । तेथ तेथ दाऊ नंदा अनिरुद्ध राहे ।

## परम पूज्य सद्गुरु बापूंनी दिलेले ९ मापदंड

१) आन्हिक दररोज दोन वेळा करणे.

२) आह्निक,रामरक्षा,सद्गुरुगायत्री,सद्गुरुचलीसा,हनुमानचलीसा व दत्तबावनी तोंडपाठ असणे व पुस्तकात न बघता म्हणतायेणे. चार महिन्यांतून कमीत कमी एक रामनामवही लिहून पूर्ण करणे व रामनाम बँकेत जमा करणे

३) बरोबरच्या व हाताखालील सहकाऱ्यांशी उन्मत्तपणे व उद्धटपणे न वागणे. सहकाऱ्यांशी किंवा हाताखालील व्यक्तींची चूक झाल्यास त्यांना जरुर त्याबद्दल ताकीद द्यावी परंतु अपमान करु नये.

४) उपासनांच्या वेळेस त्या स्थळी असणाऱ्या प्रत्येकाने ‘आपण उपासनांच्या वर आहोत किंवा आपल्यास उपासनेची आवश्यकता नाही’ असे वर्तन करु नये.

५) बोलण्यापेक्षा, बडबडीपेक्षा कोण भक्ती व सेवेच्या कार्यक्रमात किती जीव ओतून सहभागी होतो, हे माझ्या दृष्टीने महत्वाचे आहे.

६) ह्या विश्वामध्ये कुणीही मानव ‘ आपण एकमेव अद्वितीय आहोत व आपली जागा दुसरा कुणीही घेऊ शकत नाही किंवा आपल्यासारखे कार्य करु शकत नाही’ असे म्हणू शकत नाही व असे कुणीही मानू नये.

७) श्रद्धावानांच्या नऊ समान निष्ठा त्याला मान्य असल्याच पाहिजेत व त्याच्या आचरणातही असल्याच पाहिजेत.

८) चूक झाल्यास चूक सुधारण्याची तयारी पाहिजे

९) परपीडा कधीच करता कामा नये.

## श्रद्धावानांच्या नऊ समान निष्ठा

१) श्रीमद्‌पुरुषार्थ ग्रंथराज
२) हरि ॐ
३) गायत्री मंत्र
४) पुनर्जन्माचा सिद्धान्त अर्थात कर्माचा अटळ सिद्धान्त
५) त्रिपुरारि त्रिविक्रम चिह्न
६) गंगामाता व गोमाता
७) धार्मिक कार्यप्रसंगी वेश
   - ❖ पुरुषांसाठी श्‌वेत लुंगी, श्‌वेत सदरा, श्‌वेत झब्बा किंवा श्‌वेत शर्ट
   - ❖ महिलांसाठी साडी किंवा पंजाबी पद्धतीचा पेहराव
   - ❖ दोघांसाठीही श्‌वेत उपरणे आवश्यक

८) गोवर्धन उदी
९) अनिरुद्ध हाच सर्वोच्च सखा, पिता व त्राता.

## परमात्म्यास अत्यंत आवडणारे नऊ प्रकारचे थेंब

१) भगवंताच्या दर्शनाने निर्माण झालेले आनंदाश्रू.
२) भगवंताच्या विरहामुळे उत्पन्न होणारे विरहाश्रू.
३) परमात्म्याच्या कार्यासाठी व सेवेसाठी परिश्रम करताना येणाऱ्या घामाचे थेंब.
४) तहानेने व्याकूळ झालेल्यास प्रेमाने दिले गेलेले पाण्याचे थेंब.
५) भुकेलेल्या अनाथ व असहाय्य जीवास दिलेल्या अन्नरसाचे थेंब.
६) कुठल्याही फायद्याशिवाय वनस्पतीस दिलेल्या पाण्याचे थेंब..
७) रामनामाची वही लिहिताना वापरलेल्या शाईचे थेंब.
८) श्रीमद्‌पुरुषार्थ ग्रंथराजासमीप प्रज्वलित केलेल्या दीपातील तेलाचे, तुपाचे व मेणाचे थेंब
९) एका श्रद्धावंताने दुसऱ्या श्रद्धावंतासाठी निरपेक्ष भावनेने केलेल्या रक्तदानाचे थेंब.
   - ❖ जो कोणी भगवंताच्या कार्यासाठी मृत्यू स्वीकरतो, त्याच्या शरीरातील रक्ताचा प्रत्येक थेंब परमेश्वर गंगाजलाएवढाच पवित्र बनवीत असतो व त्याचे प्राण गंगोत्रीप्रमाणे.